Set - B

| CBSE X<br><br>Date : | **MT EDUCARE LTD.**<br>SUBJECT : MARATHI<br>**SEMI PRELIM - II**<br>**MODEL ANSWER PAPER** | Marks : 80<br><br>Time : 3 hrs. |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| | **खंडः 'क'** | |
| **A.1.** | | |
| १. | वर्तमानकाळ | **1** |
| २. | विशेषण - सुंदर, काही | **1** |
| ३. | पूर्वी घर ही स्थिर वस्तू होती. पण आधुनिक काळात घरांना चाके फुटली आहेत. म्हणजे मोटारगाडीमागे अशी फिरती घरे जोडलेली असतात. बसाय्-उठायची खोली, शयनगृह, पाकगृह सगळे काही त्यात असते. त्यातून लोकांची भ्रमन्ती चाललेली असते. असल्या फिरत्या घरांसाठी जागोजागी मोकळी मैदाने असतात. तिथे पैसे भरून थोडा काळ राहता येते. काही वेळा सुंदर अरण्यात सुट्टी घालवता येते. तंबू घेऊन जायचे आणि मोकळयावर राहायचे. धम्माल करायची. अशा भ्रमंतीतून शांती लाभेल, अशी श्रद्धा आहे. त्यातूनच फिरत्या घराचे अस्तित्व पुढे आले. | **2** |
| ४. | दिशाहीन भ्रमंतीतूनच जगभर हिंडणाऱ्या अमेरिकन टूरिस्टांच्या उदय झाला आहे. कुठल्याही देशात, कुठेही कुठलीही प्राचीन वास्तू किंवा दृश्य सतत कॅमेऱ्याने टिपीत हे अमेरिकन टूरिस्ट भ्रमण करत असतात. ताजमहालापेक्षाही, जिथे किड्यासारखे मानवी जीवन वळवळत असते असल्या झोपडपट्ट्या पाहण्यात त्यांना खूप उत्साह असतो. कारण समृध्द अमेरिकेतल्या लोकांना त्यात 'न्यू' आणि 'एक्सायटिंग' असे काहीतरी पाहायला मिळते. | **2** |
| **A.2.** | | |
| १. | कमकुवत - कमजोर, दुर्बळ | **1** |
| २. | पक्षी पंख हलवून हवा ढकलतात त्यामुळे पक्षी हवेत उडू शकतात. | **1** |
| ३. | पक्ष्यांच्या मानाने मानवाचे शरीर खूपच बोजड असते. शिवाय पक्षी जेवढ्या जोराने आपले पंख हलवतील तेवढ्या जोराने माणसाला आपले पंख हलविता येणार नाहीत. पक्षी जरी आकाराने लहान आणि वजनाने हलके असले तरी त्यांचे स्नायू हलविण्याची शक्ती माणसाच्या स्नायूमध्ये नसते. त्यामुळे माणसाला पंख दिले तरी त्याला उडता येणार नाही. | **2** |
| ४. | इतर पक्ष्यांच्या तुलनेने शहामृगाचे शरीर बोजड असते. शिवाय त्याचे पंखही कमकुवत असतात. म्हणूनच शहामृग उडू शकत नाही. | **2** |

| | | |
|---|---|---|
| | **खंडः 'ख'** | |
| **A.3.** | **खालीलपैकी एका विषयावर निबंध लिहा.** | |
| १. | **श्रमाचे महत्त्व**<br>नसे राऊळी वा नसे मंदिरी<br>जिथे राबती हात तेथे हरी<br>नेपोलियनने म्हटल्याप्रमाणे, "The word impossible is only in the dictionary of fools". अशक्य हा शब्द केवळ मूर्खांच्याच शब्दकोशात आढळतो असे म्हटले जाते. हे नेपोलियनचे विधान अगदी खरे आहे. जर आपल्याला आयुष्यात कोणतीही गोष्ट मिळवायची तर श्रम करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.<br>श्रमाने आपण जगातील कोणतीही गोष्ट साध्य करू शकतो 'केल्याने होत आहे रे आधि केलेचि पाहिजे'. धन, विद्या, किर्ती या गोष्टी श्रमाने प्राप्त होतात.<br>प्रसिद्ध कवी मोरोपंत आपल्या आर्येत म्हणतात, ''घनांबु न पडे मुखी उघडल्याविना पाखरे'' म्हणजे पाखरांना सुद्धा तोंड उघडल्याशिवाय पाण्याचा थेंब मिळत नाही. 'असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी' असे म्हणून नुसते बसून राहणाऱ्यांचा कधीच उद्धार होत नाही. आळस हा माणसाचा शत्रू आहे. या आळशीपणानेच आपल्या प्रगतीत बाधा येते. आपल्याला आपल्या जीवनातील इच्छा, आकांक्षा, ध्येय पूर्ण करायच्या असतील तर श्रमाशिवाय पर्याय नाही. अशा श्रमानेच आज जगात अनेक व्यक्ती थोर पदाला पोहोचल्या आहेत. कर्वे, फुले, आगरकर यांनी कष्ट करून, धीर न सोडता, लोकांचा विरोध पचवून स्त्री शिक्षणाचे कार्य चालू ठेवले. म्हणून त्यांच्या या प्रयत्नांनीच आजच्या स्त्रीने अनेक क्षेत्रे पादाक्रांत केली आहेत. डॉ. आंबेडकर यांनी शिक्षणासाठी खूप कष्ट उपसले. आपल्या देशभक्तांनी, क्रांतिकारकांनी फार मोठ्या कष्टांनी स्वातंत्र्य मिळवले. माहुली गावाचा एक अडाणी, गरीब मुलगा राम हा काशीला गेला व आपल्या श्रमाच्या जोरावर तो 'रामशास्त्री प्रभुणे' झाला.<br>दुसऱ्या महायुद्धात जपान पूर्ण बेचिराख झाला. पण जपानी माणूस डगमगला नाही. स्वतःच्या देशाला पुन्हा उभे करण्यासाठी त्यांनी घाम गाळला, अहोरात्र कष्ट केले व आपल्या प्रयत्नांच्या जोरावर काही काळातच जपानसारखे राष्ट्र अमेरिकेच्या तोडीस तोड बनले.<br>मज नकोत अश्रू, घाम हवा ।<br>हा नव्या युगाचा मंत्र नवा ।।<br>मानवाने दगडावर दगड घासून अग्नी निर्माण करण्यापासून ते आज संगणकापर्यंत प्रगतीचा प्रवास केला तो श्रमाच्या जोरावरच. आजचे युग विज्ञान युग आहे. गॅलिलिओ, कोपरनिकस, एडिसन, होमी भाभा अशा शास्त्रज्ञांनी अतिशय कष्ट सोसून अडचणीवर मात करून अनेक शोध लावले आणि म्हणूनच आजचा मानव मंगळावर वस्ती करण्याची योजना करत आहे. | **7** |

| | | |
|---|---|---|
| | कवी माधव ज्यूलियन यांनी म्हटल्याप्रमाणे, 'थांबला तो संपला'. जो श्रम करत नाही, प्रयत्न करत नाही त्याची कधीही प्रगती होत नाही. आजच्या स्पर्धायुगात आपला भविष्यकाळ उज्ज्वल बनवण्यासाठी वर्तमानात श्रम करणे अतिशय गरजेचे आहे. म्हणूनच कवींनी म्हटल्याप्रमाणे म्हणावेसे वाटते ....<br>''कष्ट करा रे कष्टापोटी,<br>फळे असती रसाळ गोमटी'' | |
| २. | **परीक्षा रद्द झाल्या तर ....**<br>परीक्षा.. परीक्षा.. परीक्षा.. फक्त अभ्यासच कर,<br>सगळ्यांच्या आईबाबांचा एकच गजर<br>कंटाळा आला या परीक्षांचा ! असे वाक्य नेहमीच लहान मुलांपासून मोठ्या मुलांपर्यंतच्या किंबहुना सगळ्यांच्याच तोंडावर ऐकायला मिळते. आज लहान मुलांच्या जीवनातील आनंद ओरबाडून घेणारी जर कोणती बाब असेल तर ती म्हणजे 'परीक्षा' होय ! एखाद्या नावाजलेल्या शाळेत प्रवेश मिळविण्यासाठी २१/२ - ३ वर्षांच्या बाळालाही परीक्षेला तोंड द्यावे लागते. खरे पाहता ही लहान मुले या परीक्षेने हैराण झाली आहेत. खरे पाहिले तर परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांचे अभ्यासात होणारे मूल्यमापन असते. शाळांतील, महाविद्यालयातील मुले परीक्षांत उत्तम गुण मिळविण्यासाठी धडपडत असतात. विशेषतः दहावीची बोर्डाची परीक्षा आली तर त्यांच्या तोंडचे पाणीच पळते. कारण परीक्षा ही मुलांसाठी आणि त्यांच्या पालकांसाठी 'परमदैवत' बनली आहे. अजूनपर्यंत पालकांनी कामावरील सुट्ट्यांची कारणे फिरायला जाणे, आजारी असणे ही असायची. पण आजकाल मुलाची परीक्षा आहे म्हणून महिनाभर सुट्टी घेणारे पालकही आपल्याला वारंवार दिसतात. परीक्षेला अवास्तव महत्त्व देण्यात येत आहे. म्हणून मुलांना न राहून वाटते की परीक्षा रद्द झाल्या तर .....<br>हा विचार मनात येताच खूप बरे वाटते. आनंदाने नाचावेसे वाटते पण दुसऱ्याच क्षणी भानावर आल्यावर कळते की, जर परीक्षा नसतील तर किती गोंधळ, अडचण निर्माण होईल ? माणसाला आपल्या आयुष्यात क्षणाक्षणाला परीक्षा द्यावी लागते मग ती नसून कसे बरे चालेल. परीक्षा नसतील तर रिझल्ट कसा मिळणार. शिक्षक विद्यार्थ्यांना पहिल्या वर्गातून दुसऱ्या वर्गात कसे व कोणत्या आधारावर टाकणार. परीक्षा नाही म्हणजे विद्यार्थी अभ्यास करणार नाहीत. मग अभ्यास न करता होणारे डॉक्टर, शिक्षक, वकील कशाप्रकारे वागतील. डॉक्टर तर चुकीचे औषध देऊन मारूनच टाकेल, इंजिनिअर इमारतीचे योग्य काम करणार नाही, शिक्षक चुकीचे शिकवतील. नको रे बाबा ! हा विचार करूनच भीती वाटते. त्यापेक्षा थोडा अभ्यास करून परीक्षा दिलेलीच बरी. परीक्षा असणे हे अत्यंत आवश्यक आहे कारण त्याशिवाय विद्यार्थ्यांची प्रगती कळणार नाही. चांगले गुण मिळाल्यावर वर्गात कौतुक होणार नाही. बक्षिसे, पारितोषिके मिळणार नाहीत. म्हणून मला असे वाटते की | 7 |

परीक्षा असायला हव्यात, त्या रद्द होऊन चालणार नाही.

'परीक्षेने होते ज्ञानाचे मूल्यांकन
शिक्षणाचा ध्यास घ्या हेच खरे धन'

३. **विदूषकाचे आत्मवृत्त** 7

'डोळ्याभोवती मोठे पिवळे वेटोळे. लालचुटूक नाक, डोक्यावर लांब टोपी, अंगावर सैलसर चट्ट्यापट्ट्यांचा पोशाख, काय मंडळी ओळखलंत का मी कोण आहे ते? होय, अगदी बरोबर ! तुम्हांला हसवणारा, तुम्हाला आवडणारा मी सर्कशीतला विदूषक आहे.

आत्मकथन म्हटलं की साहित्यिक, राजकारणी, समाजसेवक सहज डोळ्यासमोर येतात. पण तुम्ही कधी आमच्या आयुष्यात डोकावून बघितलं आहे का? नाही ना. चला तर, मी तुम्हांला माझ्या आयुष्याची सफर घडवून आणतो.'

'मी एका गरीब कुटुंबात जन्माला आलो. गरीब वस्तीत वाढल्यामुळे मला समाजातल्या सर्व स्तरातल्या लोकांना पाहता आले. याचाच परिणाम की काय मी हळूहळू अनेकांच्या नकला करायला लागलो. चौथीपर्यंत कशीबशी शाळा झाली. पुढे घरची परिस्थिती शिक्षण घेऊ देईना म्हणून छोटी-मोठी कामे करायला सुरूवात केली. ज्या लहान वयात बागडायचं, खेळायचं, हसायचं, त्या वयात मी डोक्यावर कुटुंबाचा भार वाहत होतो. खेळणारी, बागडणारी, हसणारी मुले बघितली की, मन विषण्ण व्हायचं. पण या अनुभवाने मला जगाकडे बघण्याचा नवीन दृष्टिकोन मिळाला. मनाशी ठरवलं आपल्या हसण्याखिदळण्याच्या वयात जे जमलं नाही त्यापासून इतरांना वंचित होऊ द्यायचं नाही. माझा एक मित्र सर्कशीत काम करत होता. त्याने मला विचारले, 'तू सर्कशीत काम करशील का?' मी तात्काळ 'हो' म्हटलं.'

'तोंडाला रंग लागला. तंबूवर दिव्यांची रोषणाई झळकू लागली. तंबूत लोकांची गर्दी जमा झाली, वाद्यवृंद सुरू झाला आणि माझा विदूषकाचा डाव सुरू झाला. त्या दिवसापासून ते आजपर्यंत प्रत्येक खेळाला बदलणारे दर्शक दिसतात पण आम्ही मात्र तेच असतो. त्याच कसरती पण हशा मात्र नवा असतो. घोड्यावर उलटं बसणं, चित्रविचित्र बोलणं, कोलांटी उडी मारणं आणि नकला करणं हा माझ्या जीवनाचा अविभाज्य घटक बनला आहे. सुरूवातीला काम म्हणून मी माझ्या पेशाकडे पाहायचो. पण आता लोकांना हसवणं माझा छंद बनला आहे. आपण आपल्या लहानपणी हरवलेलं 'हसू' जेव्हा मी लहानथोरांच्या चेहऱ्यावर पाहतो, तेव्हा माझा आनंद गगनात मावेनासा होतो.'

'आमच्या जीवनाचे सूत्र आहे, 'Show must go on'. तुम्हाला बरं असो वा नसो, घरात एखादा बिकट प्रसंग असो, वेदना मुखवट्यामागे लपवाव्या लागतात आणि चेहरा हसरा ठेवून 'हसण्यासाठी' आलेल्या जनतेला मनमुराद हसवावं लागतं. एकदा माझ्या खेळादरम्यान माझ्यापर्यंत एक निरोप पोहोचला. निरोप असा होता की,

माझ्या घरी माझ्या आईचा मृत्यू झाला होता. बातमीने वेदनेची कळ हृदयात उमटली, खेळ अर्धवट सोडून जायचं की नाही, या द्विधा मनःस्थितीने मी ग्रासलो होतो. शेवटी ठरवलं हा आयुष्याचा खेळ आहे, चालू राहिलाच पाहिजे. मी रडत होतो, माझ्या हालचाली संथ होत होत्या, लोकांना मात्र वाटत होते की, हा विदुषकाच्या कसरतीचाच एक भाग आहे. लोक खो-खो हसत होते. त्यांच्या हसण्याने माझ्या काळजाच्या जखमेला औषध मिळालं.'

'हे असं क्षणभंगूर जिणं घेऊन आज इथे तर उद्या तिथे. तोच तंबू, तेच सहकारी, तेच प्राण्यांचे पिंजरे, पण बदलतो तो फक्त गाव. जेव्हा लोक उभे राहून टाळ्यांचा गजर करतात, वाटतं 'आपल्या कामाची हीच पावती आहे'. बरं आहे मंडळी, चला तुमची रजा घेतो. शिट्टी वाजली आहे. माझ्या 'entry' ची वेळ झाली आहे. नाटकं आणि सिनेमा तुम्ही नेहमीच पाहता. त्यात असणारे सारेच प्रसंग नाट्यमय आणि कृत्रिम असतात. अस्सल जीवनाला जवळून पाहण्यासाठी, मला भेटण्यासाठी एकदा नक्कीच आमच्या सर्कशीला भेट द्या. याल ना?'

किंवा

**स्वाभिमानी मुलगी** 7

महाड येथे भोसले नावाचे एक श्रीमंत कुटुंब राहत होते. गीता ही त्या कुटुंबातील एकुलती एक मुलगी. त्यामुळे साहजिकच सर्वांची लाडकी पण गीताने कुटुंबातील सर्वांच्या मनाविरूद्ध एका गरीब तरूणाशी लग्न केले. झाले, सर्वांना तिचा खूप राग आला. घरातील सर्व लोकांनी तिच्याशी संबंध तोडले.

लग्नानंतर पहिल्या दिवाळीला ती माहेरी आली. तिला वाटले, आता तरी आईवडिलांचा राग शांत झाला असेल. पण छे! तिच्या आईवडिलांनी तिचा गरिबीवरून अपमान केला. कोणीही तिच्याशी प्रेमाने बोलले नाही. तेव्हा तिने माहेरी परत न येण्याचा निश्चय केला. नवरा-बायको दोघांनी मिळून प्रामाणिकपणे कष्ट करून आपली गरीबी नष्ट करण्याचा निर्णय घेतला. हळूहळू दिवस पालटू लागले. घर सुख-समृद्धी व धन-धान्याने भरून गेले. आता त्यांना कोणत्याच गोष्टीची कमी नव्हती.

अशी खूप वर्ष लोटली. बारा वर्षांनंतर गीताचा भाऊ अचानक तिच्या घरी आला. गीताला अतिशय आनंद झाला. तिने त्याचे प्रेमाने स्वागत केले. भावाने तिचा सुखी संसार पाहिला. त्याला पूर्वी गरिबीवरून आपल्या बहिणीचा केलेला अपमान आठवला. आपल्या चुकीची जाणीव होऊन आपल्या कृतीचा त्याला अतिशय पश्चात्ताप झाला.

**तात्पर्य : माणसाचे सर्व दिवस सारखे नसतात, त्यामुळे कोणाचाही अपमान करू नये.**

**A.4.** **खालील विषयावर पत्र लिहा.** **5**

संजय जाधव
सरस्वती विद्यालय,
जोगेश्वरी (प.),
मुंबई.
दि. २७ जानेवारी,२०१७

प्रति,
मा. व्यवस्थापक,
आयडीयल ग्रंथ भांडार,
महात्मा गांधी रोड, दादर (प.),
मुंबई.

विषय – शालेय ग्रंथालयासाठी पुस्तकांची मागणी.

माननीय महाशय,

सप्रेम नमस्कार.

मी संजय जाधव, 'सरस्वती विद्यालय' या शाळेतील विद्यार्थी प्रमुख या नात्याने मुख्याध्यापकांच्या संमतीने हे पत्र लिहित आहे. आमच्या शाळेच्या ग्रंथालयासाठी खालील पुस्तकांची आवश्यकता आहे. तरी कृपया ती पुस्तके शाळेच्या पत्त्यावर त्वरीत पाठवून द्यावी. सोबत पुस्तकांचे देयक (बिल) पाठवावे. जेणेकरून तुमची रक्कम त्वरीत देण्याची व्यवस्था करता येईल.

**पुस्तकांची यादी पुढीलप्रमाणे :**

| **क्र.** | **पुस्तकाचे नाव** | **लेखकाचे नाव** | **प्रती** |
|---|---|---|---|
| १ | शिवछत्रपती | श्री. बाबासाहेब पुरंदरे | ०५ |
| २ | बटाट्याची चाळ | पु. ल. देशपांडे | १० |
| ३ | स्वामी | रणजित देसाई | ०७ |
| ४ | यश तुमच्या हातात | शिव खेरा | ०५ |

वरील पुस्तके विद्यार्थ्यांसाठी असल्यामुळे कृपया पुस्तकांवर योग्य ती सवलत द्यावी, ही नम्र विनंती.

कळावे, तसदीबद्दल क्षमस्व.

आपला विश्वासू,
संजय जाधव
(विद्यार्थी प्रमुख)

तिकीट

प्रति,
मा.व्यवस्थापक,
आयडीयल ग्रंथ भांडार,
महात्मा गांधी रोड, दादर (प.),
मुंबई.

प्रेषक,
संजय जाधव
सरस्वती विद्यालय,
जोगेश्वरी (प.),

**किंवा**

आनंद सावंत 5
विकास हायस्कूल,
कन्नमवार नगर, पुणे
दि.१५ डिसेंबर, २०१७

प्रति,
मा. सचिन तेंडूलकर
ए-५, इंद्रवदन सोसायटी,
सेना भवन, दादर.

विषय – क्रिकेट स्पर्धेच्या उद्‌घाटनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्यासाठी निमंत्रण पत्र.

माननीय महाशय,

सप्रेम नमस्कार.

मी, आनंद सावंत, विकास हायस्कूल, पुणे येथून आपणास पत्र लिहित असून दरवर्षीप्रमाणे यंदाही आमच्या शाळेत जानेवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात 'क्रिकेट-स्पर्धा' आयोजित करण्यात येणार आहेत. तेव्हा प्रमुख पाहुणे म्हणून सर्व विद्यार्थ्यांनी, क्रिकेट रसिकांनी आपल्याच नावाची शिफारस केली आहे.

आम्हा सर्व विद्यार्थ्यांचा क्रिकेट हाच आवडता खेळ आहे. तुम्हीच आमचे सर्वांत आवडते क्रिकेटपटू आहात. आजवर तुम्ही क्रिकेट विश्वात केलेले विक्रम सर्वांनाच माहित आहेत. त्यामुळे तुम्हाला प्रत्यक्ष भेटावे, तुमच्याकडून क्रिकेटच्या गोष्टी ऐकाव्या व तुमचे मार्गदर्शन मिळावे अशी आमची इच्छा आहे.

तरी कृपया आपण वेळात वेळ काढून कार्यक्रमाला यावे, ही नम्र विनंती.

कळावे, तसदीबद्दल क्षमस्व.

आपला नम्र,
आनंद सावंत

| | | |
|---|---|---|
| | तिकीट<br>प्रति,<br>मा. सचिन तेंडूलकर<br>ए-५, इंद्रवदन सोसायटी,<br>सेना भवन, दादर.<br>प्रेषक,<br>आनंद सावंत<br>विकास हायस्कूल,<br>कन्नमवार नगर, पुणे. | |
| | **खंड 'ग'** | |
| **A.5.** | **अ) खालील प्रश्नांची उत्तरे कंसातील सूचनेप्रमाणे सोडवा. (कोणतेही चार)** | |
| १. | भरपूर - विशेषण | 1 |
| २. | उभयान्वयी अव्यय - आणि | 1 |
| ३. | केवलप्रयोगी अव्यय - छे ! | 1 |
| ४. | क्रियापद - करते | 1 |
| ५. | विशेषण - दयाळू | 1 |
| ६. | ती - सर्वनाम | 1 |
| **A.5.** | **आ) पुढील वाक्ये कंसातील सूचनेप्रमाणे लिहा. (कोणतेही दोन)** | |
| १. | कर्तरी प्रयोग | 1 |
| २. | भावे प्रयोग | 1 |
| ३. | केवढा आवाज असतो शांतलेला ! | 1 |
| ४. | आम्ही कधी आपण होऊन परस्थांच्या घरी अनाहूतपणे जातो का? | 1 |
| **A.5.** | **इ) सूचनेनुसार बदल करा. (कोणतेही दोन)** | |
| १. | वर्तमानकाळ | 1 |
| २. | हितेश कविता वाचतो. | 1 |
| ३. | भविष्यकाळ | 1 |
| ४. | सैनिकाने शत्रूला मारले. | 1 |
| **A.5.** | **ई) लिंग बदला. (कोणतेही दोन)** | |
| | १. नाग - **नागीण**    २. पती - **पत्नी** | 1 |
| | ३. तरूण - **तरूणी**    ४. देव - **देवी** | 1 |

| | | |
|---|---|---|
| **A.5.** | उ) **वचन बदला. (कोणतेही दोन)** | |
| | १. आंबे - **आंबा** २. भाकरी - **भाकऱ्या** | 1 |
| | ३. शहर - **शहरे** ४. नद्या - **नदी** | 1 |
| **A.5.** | ऊ) **समानार्थी शब्द लिहा. (कोणतेही दोन)** | |
| | १. पोट - **उदर** २. घर - **सदन, गृह** | 1 |
| | ३. सण - **उत्सव** ४. सूर्य - **भास्कर, रवी, दिनकर** | |
| | **1** | |
| **A.5.** | ए) **विरुद्धार्थी शब्द लिहा. (कोणतेही दोन)** | |
| | १. नवीन × **जुने** २. कठीण × **सोपे** | 1 |
| | ३. विरोध × **बिनविरोध** ४. कमी × **जास्त** | 1 |
| | **खंड 'घ'** | |
| **A.6.** | अ) **योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा. (कोणतेही चार)** | |
| १. | चार-पाचशे वर्षांत **वंशवेल** बरीच विस्तारत गेली आहे. | 1 |
| २. | वरोऱ्याच्या **नगरपालिकेचे** उपाध्यक्ष म्हणून ते बिनविरोध निवडून आले. | 1 |
| ३. | मानसी वाचता वाचता तशीच **झोपी** जाते. | 1 |
| ४. | मुंग्या सगळ्या **स्तब्ध** होऊन ऐकत होत्या या नागिणीचे शहाणपण. | 1 |
| ५. | एकदा मी घार झालो **आभाळात** फिरून आलो. | 1 |
| ६. | आता या आनंदवनात **विकासाची** पावलं उमटू लागली. | 1 |
| **A.6.** | आ) **खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही सहा)** | |
| १. | पुस्तकराव पाय ठणकतोय, अशी तक्रार करतात. | 1 |
| २. | माणसाचं आयुष्य केवळ क्षणभंगुर आहे. | 1 |
| ३. | शेताच्या कर्त्याकडून अम्मा भात आणायची. | 1 |
| ४. | मुंग्यांची मुलं नागावर रागावली. | 1 |
| ५. | 'आनंदवन' महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्ह्यात आहे. | 1 |
| ६. | केशवचा स्वभाव जरा म्हणजे जास्तीचा कंजूष आहे. | 1 |
| ७. | बाबांनी 'आनंदवनाचे' स्थान जगाच्या नकाशात उच्च स्थानावर नेऊन ठेवले आहे. | 1 |
| ८. | संदल दाट असायला हवे, अन्यथा स्वीकारले जात नाही. | 1 |

**A.7.** अ) आकृतिबंध पूर्ण करा. (कोणतेही तीन)

१. 2




२. 2




३. 2




४. 2




५. 2




आ) **खालील प्रश्नांची ३० ते ४० शब्दांत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

१. बाबा आमटे यांचं डॉक्टर बनण्याचं स्वप्न होतं. परंतु वडिलांच्या इच्छेप्रमाणे बाबा आमटे वकील झाले. वकिली करू लागले पण वकिलीत त्यांचे मन रमेना. पुढे वरोऱ्याच्या नगरपालिकेचे उपाध्यक्ष म्हणून ते बिनविरोध निवडून आले. त्या कार्याबरोबर त्यांचे इतरही कार्य चालू होते. एका ऐषआरामी घरात जन्म घेऊनसुद्धा मैल्याच्या पाट्या डोक्यावरून 3

| | | |
|---|---|---|
| | वाहणे, संडास साफ करणे अशी कामेही ते करत. कारण समाजातील एका विशिष्ट गटानेच ही कामे करावीत, हे त्यांना आवडत नव्हते. आनंदवनाच्या निर्मितीआधी ते सर्व जातीच्या लोकांना एकत्र करून राहू लागले. त्यावेळी सर्वजण दिवसभर आपापले काम करत असत व सायंकाळी जमलेल्या मजुरीतून भाजी-भाकरी बनवीत असत. बाबांची ही छोटी वसाहत अनेक वर्षे गुण्या-गोविंदाने नांदत होती. <br> अशाप्रकारे बाबा आमटेंनी लोकांना श्रमाचे महत्त्व पटवून आनंदवनाच्या निर्मितीआधी श्रमाश्रमाचा प्रयोग केला. | |
| २. | फुलं ज्या सहजपणाने फुलतात, सहज रंग धारण करतात, सहजतेनं विकसित होतात, त्याप्रमाणेच माणसाचे जीवन फुलले पाहिजे. फुलण्याचा, बहरण्याचा कुणाचा अधिकार कुणी हिरावून घेऊ नये. कुणी कुणाचा मालक होऊ नये. त्याचप्रमाणे कुणी कुणाचा गुलाम होऊ नये. माणसे जर पाखरासारखी उडून जाणार असतील, तर पाखरासारखीच त्यांनी बेगमी केली पाहिजे. पिढ्या न् पिढ्या आपल्या संततीने कुठलेही कष्ट न करता जगावे इतकी संपत्ती माणसाने जमा करू नये. शिवाय अशी जमवलेली संपत्ती असेल तर अशा संपत्तीवर त्याच्या मुलाबाळांनी अधिकार सांगावा इतके वाईट जीवन त्याच्या मुलांनी स्वीकारू नये. आपल्या वाईटाचा वारसादेखील पुढील पिढ्यांवर लादू नये. <br> अशाप्रकारे स्वाभाविकपणे फुला आणि इतरांनाही फुलू द्या, अशी निसर्गाची आपणाकडून माफक अपेक्षा आहे. | 3 |
| ३. | 'बाबूजी' हे लेखकाच्या गावातील एक चांगले व्यक्ती होते. ते नेहमी दुसऱ्यांच्या मदतीला धावून जायचे. केशव आणि सरिता ही दोन मुले त्यांना होती. गावात शिक्षणाची सोय नव्हती म्हणून शिक्षणासाठी दोघांना बाबूजींनी नाशिकला ठेवलं. त्यांच्या शिक्षणावर खूप पैसा खर्च केला. स्वतः बाबूजी उपाशी राहिले पण पोरांना त्यांनी काही कमी पडू दिले नाही. केशवला इंजिनीअर केले. त्याच्या नोकरीसाठी प्रयत्न केले. भरपूर हुंडा देऊन आर्किटेक्ट असलेल्या सरिताचे इंजिनीअर मुलाशी लग्न करून दिले. सरिताने स्वतःचा स्वतंत्र व्यवसाय सुरू केलेला होता. बाबूजींनी केशवसाठी ग्रॅज्युएट मुलगी शोधली आणि लग्न करून दिले. <br> अशाप्रकारे बाबूजींनी आपल्या मुलांच्या भवितव्यासाठी खूप कष्ट घेतले. | 3 |
| ४. | पुस्तकांच्या सान्निध्यात माणसे मोठी होतात, ज्ञानी होतात. पुस्तकरावांशी जे मैत्री करतात ते गरीब राहत नाहीत, तर ते ज्ञानाने श्रीमंत होतात. पुस्तकांच्या पानांमध्ये जीवनाचे गाणे असते. जो हे गाणे ऐकतो तोच मोठा होतो. जर पुस्तकातील चार शब्द डोक्यात गेले तरच नाणे नीट चालते. म्हणजेच ज्ञानामुळेच पैशांची खरी किंमत कळते. बाजारातल्या भाजीसारखा | 3 |

| | | |
|---|---|---|
| | पुस्तकांचा भाव करता येत नाही. पुस्तकांची किंमत अमूल्य असते. जो पुस्तक वाचतो त्यालाच त्याची किंमत कळते. पुस्तक वाचणाऱ्यांची सुद्धा त्यामुळेच किंमत वाढते. ज्याचा मित्र पुस्तकराव असतो, तोच मोठा होतो. टॉलस्टॉय, शेक्सपीअर, महात्मा फुले इ. माणसे पुस्तकांचे मित्र होते म्हणूनच मोठे झाले.<br>म्हणूनच 'तोच असतो मोठा ज्याचा मित्र पुस्तकराव' असे म्हटले आहे. | |
| **A.8.** | **अ) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा. (कोणतेही चार)** | |
| १. | चंद्र, सूर्य अन् इथली माती यांना अमुचे लाख **प्रणाम**. | **1** |
| २. | आपण जिजाऊच्या **पाती**. | **1** |
| ३. | **बाभळीच्या** बनाशेजारी आंब्याची आमराई. | **1** |
| ४. | खुरटी **झुडपे** आकाशाला भिडावीत. | **1** |
| ५. | विषमतेची **दगडगोटे** उडून जावेत अस्मानात. | **1** |
| ६. | देऊ **ललकारी** आपण ही भारी. | **1** |
| **A.8.** | **आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही तीन)** | |
| १. | तुफान समतेचं सुटावं, असे कवीला वाटते. | **1** |
| २. | कवीला गावापासून वीतभरच्या पोटाने दूर केले आहे. | **1** |
| ३. | कवीच्या मते दुःख गिळून स्त्री साऱ्या जगाला पोसते. | **1** |
| ४. | उंच नभात तिरंगा फडफडत आहे. | **1** |
| ५. | कवयित्रीस जीवन दुर्मिळ, सुंदर वाटते. | **1** |
| **A.9.** | **अ) खालील पद्यपंक्तींचा संदर्भ देऊन सरळ अर्थ लिहाः (कोणतेही एक)** | |
| १. | आपल्या देशात विविधतेत एकता आहे, हे सांगताना कवयित्रीने इंद्रधनुष्याचे उदाहरण दिले आहे. इंद्रधनुष्यामध्ये विविध रंग असले तरी त्यांची कमान मात्र एकच असते. भारतातही अशीच विविधता प्रत्येक गोष्टीत दिसून येते. परंतु, या विविधतेतही सारा देश एकतेचे महान गीत गात आहे. | **3** |
| २. | गावातील निसर्गसौंदर्याचे वर्णन कवी अगदी भावूकपणे करतो. त्याच्या गावी वेडीवाकडी वळणे घेत घेत वाहणाऱ्या नदीत खळखळणारे पाणी आहे. नदीचे सौंदर्य पाहताना कवीची नजर पाखरासारखी सर्वत्र भिरभिरते. नदीच्या तसेच गावाच्या सौंदर्याचे वर्णन करताना त्याला शब्दच सापडत नाहीत म्हणून त्याची वाणी अबोल होते. जणू निसर्गाच्या सौंदर्यात, त्या धुंद वातावरणात कवीचे मन शांत शांत होत जाते. | **3** |
| ३. | कवितेतील स्त्री म्हणते आपण व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनात सतत दुःख, हालअपेष्टा, अपमान, उपेक्षा सोसत असतो. पण हे सगळे सोसूनही कितीही दुःख असले तरी आपल्याला ते विसरून सतत साऱ्या जगाला म्हणजेच आपल्या कुटुंबाला पोसावं लागतं. | **3** |

आपल्या मनाची माती करून म्हणजेच सारा मान-अपमान विसरून सगळी नातीगोती जपावी लागतात.

**A.9. आ) आकृतिबंध पूर्ण करा. (कोणतेही दोन)**

१. **2**




२. **2**




३. **2**



**A.10. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

१. पंढरपुरातील नागरिकांचे स्नान हे चंद्रभागेच्या पाण्यात वेगळ्याच शैलीत चालते. पंढरपुरीच्या चंद्रभागा स्नानाला पावित्र्याचा स्पर्श असतो. श्लोक, मंत्र, स्तोत्र म्हणत, मनात विठ्ठलाचे ध्यान करत स्नान केले जाते. स्नानानंतर लोक घरी न जाता प्रथम विठ्ठल मंदिराकडे जातात व नंतरच घरी जातात. लेखक जेव्हा १९६१ मध्ये पंढरपुरला गेले तेव्हा ते गाव सकाळी आठ वाजेपर्यंत झोपलेले असायचे. प्रत्येक दुकानाच्या आडव्या फळ्यांवर माणसे खुशाल झोपलेली दिसत. पंढरपुरी संस्कृती वेगळ्या उद्योगाची होती. ती वर्षातून दोनदा येणाऱ्या वारीवर बेतलेली असायची. विठ्ठलमंदिर हे त्या संस्कृतीचे केंद्र होते. पंढरपुरीत मठांची संख्या भरपूर आहे. वर्षभर पंचक्रोशीतील आणि वारीच्या वेळी वारकरी तेथे जमत असत. पंढरपुरात गल्ल्यांना, चौकांना तसेच दुकानांनाही साधुसंतांची नावे दिलेली दिसतात. **2**

रत्नागिरी शहरात एकही तालीम नाही. येथील मासळी बाजार खूप मोठा आहे. त्याचा उग्र वास वातावरणात भरलेला असतो. लाल, लाल साध्या रस्त्यांचे देखणेपण रत्नागिरीला लाभले आहे. समुद्राची गाज रात्रभर वातावरणात गंभीरपणे भरून राहते. येथे पावसाळ्यात आणि हिवाळ्यातही थंडी वाजत नाही, याचे लेखकाला आश्चर्य वाटते.

अशाप्रकारे पंढरपूर आणि रत्नागिरी या गावांतील विविध वैशिष्ट्ये लेखकाने वर्णन केली आहेत.

२. चिनारचे आई व बाबा दोघंही एक छोटं हॉटेल चालवायचे. दोघंही दिवसभर या ना त्या कामात गुरफटलेले असायचे. आईबाबांची कामांची धांदल चिनारला कळायची. त्याला आपले आईबाबा खूप आवडायचे. चिनारचे आईबाबाही चिनारचे खूप कौतुक करायचे. त्याच्या शेजारचेही आपल्या मुलांना सांगायचे, ''बघा...बघा किती शहाणी मुलं आहेत. आईबाबांना दमवत नाहीत. अभ्यास करतात. उलटं बोलत नाहीत.'' खरं तर अशा कौतुकाचा कुणालाही आनंदच होतो. पण चिनारचे आईबाबा हॉटेलात दिवसभर काम करून फार दमायचे. कधी कधी तर चिनारचा अभ्यास घ्यायलाही त्यांना वेळ मिळत नसे. अशा वेळी आपल्या आईबाबांचे पाय दाबून द्यावेत, डोक्याला तेल लावावे, हॉटेलात काहीतरी मदत करावी असे चिनारला खूप वाटायचे. पण वेळच मिळायचा नाही. मनाला वाटूनसुद्धा आपण त्यांना काहीच मदत करत नाही. चांगली मुलं सगळ्यांना मदत करतात. आपण मात्र मदत करीत नाही. तरीही आपल्याला लोकांनी चांगलं म्हटलं तर आपण खोटारडेच आहोत, असे चिनारला वाटले. **2**

अशाप्रकारे स्तुतीस पात्र नसतानाही लोकांनी केलेल्या स्तुतीमुळे आपण खोटारडे आहोत, असे चिनारला वाटायचे.

| | | |
|---|---|---|
| ३. | लेखक हायस्कूलमध्ये शिकत असताना त्याला गुळाच्या गाड्यांबरोबर जावे लागे. शाहूपुरीतील अडत दुकानात उतरून गुळाचा हिशोब घेऊन येण्याची जबाबदारी वडिलांनी त्याच्यावर सोपवलेली होती. कोल्हापुरात त्यावेळी गुऱ्हाळांचा एक विशिष्ट काळ असे. हा गूळ 'कोल्हापुरी गूळ' म्हणून प्रसिद्ध होता. तो खरेदी करण्यासाठी गुजरातहून व्यापारी मंडळी येत. कोल्हापुरी गुळाची चव खास आहे. हा ताजा गूळ शाहूपुरीत सर्वत्र ढेपाढेपांनी रचलेला दिसे. त्याचा गंध आल्यानंतर तो खाण्याचा मोह कोणालाही होई. त्याचा रंगही असाच मनाला आकर्षित करणारा असे. कोल्हापुरी गुळाच्या चवीचे आणि रंगगंधाचे हे वैशिष्ट्य या पंचक्रोशीतील 'माती'च्या गुणातूनच निर्माण झालेले आहे.<br>अशाप्रकारे लेखकाने कोल्हापुरी गुळाचे वर्णन केले आहे.<br><br>❖❖❖❖ | 2 |